# परिशिष्ट

## परिशिष्ठ - 'अ'

## स्थानिक लोकांना मुलाखतीसाठी दिली जाणारी मुलाखत सूची

प्राथमिक माहिती :

नाव :

गाव :

गावात किती वर्षे वास्तव्य :

शिक्षण :

व्यवसाय :

एकूण शेत :

भाताचे क्षेत्र :

भुईमूग क्षेत्र :

ऊस क्षेत्र :

कडधान्य क्षेत्र :

इतर क्षेत्र :

### घटक : वनसंपदा

१) तुमच्या गावात कोणकोणत्या वनस्पती आहेत ?

अ) वड ब) पिंपळ क) निलगिरी ड) सागवान

इ) इतर

२) तुमच्या गावात इमारतीसाठी लाकूड देणारी वनस्पती कोणीत आहे ?

अ) निलगिरी ब) सागवान क) शिसव ड) इतर

३) तुमच्या गावात जळणासाठी कोणत्या वनस्पतीचा वापर करता ?

अ) बाभूळ ब) आंबा क) फणश ड) उंबर

इ) इतर

४) तुमच्या परिसरात औषधी वनस्पती कोणत्या आहेत ?

अ) आढूळसा ब) बिब्बा क) शिकेकाई ड) कडूलिंब

इ) इतर

५) अडूळसा वूस्पतीचा उपयोग कशासाठी करता ?

अ) सर्दी ब) खोकला क) कफनाशक ड) इतर

६) बिब्बा कशासाठी वापरता ?

अ) जखमेसाठी ब) सांधेदुखीसाठी क) इतर

७) शिकेकाईचा वापर कशासाठी करता ?

अ) केस धुणे ब) पावडर करून व्यवसाय क) इतर

८) कडूलिंबाचा वापर कशासाठी करता ?

अ) दंतमंजन ब) डिंक क) सौंदर्यप्रसाधनासाठी

ड) इतर

९) आरोग्याच्या किरकोळ तक्रारीसाठी घरगुती उपाय करता का ?

अ) होय ब) नाही

१०) जखमेसाठी काय वापरता ?

अ) दगडीपाला ब) निंगडी क) बिब्बा ड) इतर

११) बाळंतिणीसाठी कोणती वनस्पती वापरता ?

अ) लिंबारा ब) बेहडा क) हिरडा ड) इतर

१२) सौंदर्यप्रसाधनासाठी काय वापरता ?

अ) चंदन ब) कडूलिंब क) कोरफड ड) इतर

१३) तुमच्या गावात इतर महत्त्वाची झाडे कोणती आहेत ?

अ) चंदन ब) बांबू बेट क) अमृता ड) बेहडा

इ) इतर

१४) तुमच्या गावात फळे देणाऱ्या वनस्पती कोणत्या आहेत ?

अ) करवंदे ब) काजू क) आंबा ड) फणस

इ) इतर

१५) तुमच्या गावात करवंदाचा व्यवसाय करतात का ?

अ) होय ब) नाही क) कमी प्रमाणात

१६) करवंदापासून तुम्हाला वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) ४०० रू. ब) ५०० रू. क) ७०० रू. ड) इतर

१७) तुमच्या शेतात आंब्याची किती झाडे आहेत ?

अ) ४ ब) १० क) ६ ड) इतर

१८) तुमच्या शेतातील अंब्यापासून तुम्हाला वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) ५००० रू. ब) ३००० रू. क) ८००० रू. ड) इतर

१९) तुमच्या शेतात काजूची किती झाडे आहेत ?

अ) २ ब) ३ क) ४ ड) इतर

२०) तुम्हाला काजूच्या झाडापासून वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) २००० रू. ब) १५०० रू. क) ३००० रू. ड) इतर

२१) तुमच्या शेतातील भातपिकापासून तुम्हाला वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) ३००० रू. ब) ४००० रू. क) ७००० रू. ड) इतर

२२) तुम्हाला कडधान्यापासून वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) २००० रू. ब) ३००० रू क) ५००० रू ड) इतर

२३) तुम्हाला ऊसापासून वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) १५००० रू. ब) २०००० रू. क) २२००० रू. ड) इतर

२४) तुम्हाला भुईमूगापासून वार्षिक किती उत्पन्न मिळते ?

अ) ६००० रू. ब) ५००० रू क) ८००० रू ड) इतर

२५) भुईमूग पिकाचा तुम्हाला काय उपयोग होतो ?

अ) तेल ब) पेंड क) अर्थिक ड) इतर

२६) तुम्हाला शेती करताना कोणकोणत्या अडचणी येतात ?

अ) जमिन : १) खारफुटी जमीन

२) पडिक जमीन

३) चुनखडीयुक्त जमीन

४) इतर

ब) खते : शेणखत, युरिया, मारूती, बैलछाप

क) पाणी : १) जास्त पाणी असते

२) कमी पाणी असते

ड) रोग : ऊस - मावा, भुईमूग - टिक्का

इ) किटकनाशके : एंड्रीन, मावा-रोगर

२७) तुमच्या परिसरात कोणते प्राणी आढळतात ?

अ) कोल्हे ब) ससा क) रानडुक्कर ड) साप

इ) इतर

२८) या प्राण्यांपासून तुम्हाला काही त्रास होतो का ?

अ) होय ब) नाही

२९) कोणत्या प्राण्यांपासून त्रास होतो ?

अ) साप ब) रानडुक्कर क) इतर

३०) तुमच्या परिसरात/शेतात कोणत्या प्रकारचे साप आढळतात ?

अ) नाग ब) धामीण क) फुरसे ड) इतर

३१) तुमच्या गावात लोकांना साप चावतात का ?

अ) होय ब) नाही

३२) जास्तीत जास्त कोणत्या प्रकारचे साप आढळतात ?

अ) धामीण ब) नाग क) नासकवणी ड) इतर

३३) साप दिसला की तो तुम्ही मारता की सोडता ?

अ) मारतो ब) सोडतो

३४) सापाला का मारता ?

अ) साप चावतो ब) काही वेळा मृत्यु क) इतर

३५) सापाचा काही उपयोग होतो का ?

अ) होय ब) नाही

३६) सापाचा काय उपयोग होतो ?

अ) बेडूक खातो ब) उंदिर खातो क) पीक रक्षण ड) इतर

३७) साप चावल्यावर कोणता इलाज करता ?

अ) घरगुती ब) सरकारी दवाखाना क) खाजगी दवाखाना ड) इतर

३८) तुमच्या परिसरामध्ये कोणकोणते पक्षी आढळतात ?

अ) मोर ब) टिटवी क) साळुंखी ड) इतर

३९) मोराचा तुम्हाला काय फायदा होतो ?

अ) साप खातो ब) निसर्गसौंदर्यत भर क) पिसांचा उपयोग ड) इतर

४०) मोराचा त्रास कशाप्रकारे होतो ?

अ) पेरणीनंतर बिया खातो ब) उगवणीनंतरचे कोंब खातो

क) इतर

४१) तुम्ही मोर मारता का ?

अ) होय ब) नाही

४२) तुम्ही कशासाठी मोर मारता ?

अ) मांस खाण्यासाठी ब) इतर

४३) तुम्ही मोराची अंडीही खाता का ?

अ) होय ब) नाही

४४) तुम्ही आणखी कोणकोणते प्राणी मारता ?

अ) शेळी ब) बोकड क) कोंबडी ड) इतर

४५) कशासाठी या प्राण्यांना मारता ?

अ) मांस खाण्यासाठी ब) त्यांच्या कातडीचा उपयोग

क) इतर

४६) तुमच्या घरी कोणते पाळीव प्राणी आहेत ?

अ) म्हैस ब) गाय क) बैल ड) शेळी

इ) इतर

४७) तुमच्याकडे किती म्हैशी, गायी, बैल, शेळ्या आहेत ?

म्हैशी अ) १ ब) २ क) नाहीत

ड) इतर

गाय अ) १ ब) २ क) नाहीत

ड) इतर

बैल अ) १ ब) २ क) नाहीत

ड) इतर

शेळी अ) १ ब) २ क) नाहीत

ड) इतर

४८) आठवड्याला एका म्हैशीपासून, गायीपासून, बैलापासून, शेळीपासून किती उत्पन्न मिळते ?

म्हैश अ) २५० ते ३०० रू. ब) ३०० ते ३५० रू.

क) इतर

गाय अ) १५० ते २०० रू. ब) २०० ते ३०० रू.

क) इतर

बैल अ) १५०० ते १७०० रू. ब) १८०० ते २००० रू.

क) इतर

शेळी अ) ५० रू. ब) १०० रू.

क) इतर

४९) एका म्हैशीला, एका बैलाला, एका गायीला महिन्याला प्रत्येकी किती खाद्य लागते ?

अ) १ पोते सुग्रास ब) १ पोते सुग्रास, अर्धा पोते कोंडा क) इतर

५०) गाय व म्हैशीच्या दूधाव्यतिरिक्त कशाचा व्यवसाय करता ?

अ) लोणी विक्री ब) दही विक्री क) तूप विक्री ड) इतर

५१) या गाय, म्हैस, बैलांना कोणते आजार होतात ?

अ) लाळ ब) बुळकी क) ताप ड) इतर

५२) म्हैशीच्या/गायीच्या स्तनातून दुधाबरोबर रक्त येणे या कारणासाठी घरगुती उपाय करता का ? डॉक्टरकडे नेता ?

अ) डॉक्टरकडे ब) घरगुती उपाय

५३) गाय, म्हैस, बैल, शेळी यांचा आणखी काय फायदा होतो ?

अ) खत ब) शेणी क) गोबरगॅस ड) इतर

५४) १ गाय, १ म्हैस किंवा १ बैल यापासून वर्षाला किती गाड्या खत मिळते ? (फक्त एका जनावरापासून)

अ) दोन गाड्या ब) ४ गाड्या क) ३ गाड्या ड) इतर

५५) तुमच्याकडे शेतीसाठी कोणती साधने वापरतात ?

अ) बैल ब) ट्रॅक्टर क) इतर

५६) बैलाचा उपयोग काय होतो ?

अ) खत ब) शेतीसाठी क) जमीन सारवणे ड) इतर

## घटक : इंधने

५७) तुम्ही स्वयंपाकासाठी कोणते साधन वापरता ?

अ) गोबरगॅस ब) साधी चूल क) निर्धूर चूल ड) सौरसाधन

इ) इतर

५८) तुमच्याकडे गोबरगॅस आहे का ?

अ) होय ब) नाही

५९) फक्त गोबरगॅसचा वापर तुमच्या कुटुंबाला पुरेसा आहे का ?

अ) होय ब) नाही

६०) गोबरगॅस का पुरत नाही ?

अ) जनावरे कमी ब) माणसे जास्त क) इतर

६१) तुमच्या घरी गोबरगॅस का नाही ?

अ) जागा नाही ब) अर्थिक बजेट कमी क) सरकारी सवलत कमी

ड) इतर

६२) शेणींचा वापर कशासाठी करता ?

अ) इंधन ब) नाचणीपीकाला क) उत्पन्न

ड) इतर

६३) जळणासाठी कोणत्या झाडाचे लाकूड वापरता ?

अ) बाभूळ ब) निलगिरी क) उंबर ड) आंबा

इ) इतर

६४) लाकूड कोठून आणता ?

अ) जंगल ब) शेत क) विकत ड) इतर

६५) कुणाच्या शेतातून लाकूड आणता ?

अ) स्वत:च्या ब) दुसऱ्याच्या क) सरकारी झाडे तोडून ड) इतर

६६) खास जळणासाठी लाकूड हवे म्हणून शेतात झाडे लावता का ?

अ) होय ब) नाही

६७) सौरसाधने कोणती वापरता ?

अ) सौर बंब ब) सौर बॅटरी क) इतर

## घटक-४ : जलसंपदा

६८) तुम्हाला पाणी कोठून मिळते ?

अ) नदी ब) तळे क) विहिर ड) इतर

६९) तुम्ही नदीच्या पाण्याचा उपयोग कशासाठी करता ?

अ) जनावरे धुण्यासाठी ब) पिण्यासाठी

क) सर्व प्रकारची धुणी धुण्यासाठी ड) इतर

७०) जनावरे प्रत्यक्ष नदीत नेवून धुता का ?

अ) होय ब) नाही

७१) धुणे प्रत्यक्ष नदीतच धुता का ?

अ) होय ब) नाही

७२) तुम्हाला नदीचे पाणी कशाप्रकारे पुरविले जाते ?

अ) नळावाटे ब) हौद क) पाण्याची टाकी ड) इतर

७३) तुमच्या घरी नळाची सोय आहे का ?

अ) होय ब) नाही

७४) तुमच्या नळाला तोटी आहे का ?

अ) होय ब) नाही

७५) तुम्ही स्वत: पाण्याचा वापर काटकसरीने करता का ?

अ) होय ब) नाही

७६) तुम्ही सांडपाण्याची सोय काय केली आहे ?

अ) गटारीत सोडणे ब) शेतील सोडणे क) परसबागेला ड) इतर

७७) तुमच्या घरी पाणीटंचाई कधी आसते का ?

अ) होय ब) नाही

७८) पाणी टंचाई नेमकी कधी भासते ?

अ) एप्रिलमध्ये ब) मे मध्ये क) नेहमी ड) इतर

७९) पाणी टंचाई किती काळ भासते ?

अ) १ महिना ब) २ महिने क) १२ महिने ड) इतर

८०) पाणी टंचाई का भासते ?

अ) नदीला पाणी नसते ब) विहिरीला पाणी नसेत

क) इतर

८१) पाणी टंचाईवर काय उपाय योजता का ?

अ) होय ब) नाही

८२) तुमच्या घरी बोअर मारले आहे का ?

अ) होय ब) नाही

८३) बोअरचे पाणी कशासाठी वापरता ?

अ) पिण्यासाठी ब) शेती क) इतर

## घटक-५ : मृदासंपदा

८४) तुमच्या गावात जमीनीचे कोणते प्रकार आहेत ?

अ) मुरमाड ब) माळरान क) जिरायत ड) रेताड

इ) इतर

८५) जमीनीमध्ये खते कोणती वापरता ?

अ) बैलछाप ब) सेंद्रिय खत क) हिरवळीचे खत ड) मिश्र खत

इ) संयुक्त खत

८६) खते कोणती वापरावीत यासाठी कोणाचे मार्गदर्शन घेता ?

अ) शेती अधिकारी ब) ग्रामसेवक क) शेती तज्ञ ड) प्रगत शेतकरी

८७) पिकांसाठी किटकनाशके कोणती वापरता ?

अ) रोगर ब) एंड्रीन क) फॉलीडॉन ड) इतर

८८) कोणती किटकनाशके वापरावीत यासाठी कोणाचे मार्गदर्शन घेता.

अ) ग्रामसेवक ब) शेती अधिकारी क) प्रगत शेतकरी ड) इतर

८९) पाणी देण्याच्या कोणत्या पध्दतीचा वापर करता ?

अ) ठिबक सिंचन ब) तुषार सिंचन पध्दती क) पाट पध्दती

इ) इतर

९०) ठिबक सिंचन पध्दतीचा काय फायदा होतो ?

अ) उत्पन्न अधिक ब) पाण्याचा योग्य वापर क) जमिनीचा कस टिकून रहाणे

ड) इतर

९१) तुषार सिंचन पध्दतीचा काय फायदा होतो ?

अ) उत्पन्न अधिक ब) पाण्याची काटकसर

क) जमीनीची प्रत टिकून रहाते ड) पिकाना माफक पाणी पुरवठा

९२) जमिनीची प्रत टिकून रहाण्यासाठी काय करता ?

अ) शेणखत ब) पाणी देण्याची योग्य पध्दती

क) शेतीला बांध बंदीस्त ड) इतर

## घटक-६ : लोकसंख्या, व्यवसाय व पर्यावरण

९३) तुमच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तुम्ही काय करता ?

अ) दुग्ध व्यवसाय ब) नोकरी क) शेती ड) इतर

९४) यातून तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सर्व गरजा भागवू शकता का ?

अ) होय ब) नाही

९५) तुमच्या घरात किती माणसे आहेत ?

अ) ४ ब) ५ क) ६ ड) इतर

९६) तुम्ही पतीपत्नीपैकी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया कोणी करून घेतली आहे का ?

अ) होय ब) नाही

९७) कुटुंबनियोजनाचे महत्त्व माहित आहे का ?

अ) होय ब) नाही

९८) कुटुंबनियोजनाचे फायदे कोणते आहेत ?

अ) सुखी कुटुंब ब) मुलांवर पूर्ण लक्ष क) आरोग्य संपन्न ड) इतर

## घटक - १ : आरोग्य व पर्यावरण

९९) तुमच्या घरी सतत कोणी आजारी असते का ?

अ) होय ब) नाही

१००) तुमच्या घरात अलीकडे कोणी व्यक्ती मयत झाली आहे का ?

अ) होय ब) नाही

१०१) ती व्यक्ती कोणत्या आजाराने मयत झाली ?

अ) टी.बी. ब) एड्स क) कॅन्सर ड) इतर

१०२) तुम्हाला कोणते व्यसन आहे का ?

अ) होय ब) नाही

१०३) तुमच्या व्यसनाचा तुमच्या घरातील लोकांना काही त्रास होतो का ?

अ) होय ब) नाही

१०४) तुम्ही तंबाखू लावता का ?

अ) होय ब) नाही

१०५) तुमच्या घरातील आजारी व्यक्तींना इलाजासाठी कोणाकडे नेता ?

अ) सरकारी दवाखाना ब) खाजगी दवाखाना क) देवीकडे ड) इतर

१०६) तुम्ही कोणत्या बाबींसाठी घरगुती उपाय करता ?

अ) जखम ब) सर्दी/खोकला क) कंबरदुखी/सांधेदुखी

ड) इतर

## घटक-८ : प्रदूषण व इतर

१०७) तुमच्या घरी चूल आहे का ?

अ) आहे ब) नाही

१०८) कोणत्या प्रकारची चूल आहे ?

अ) साधी चूल ब) निर्धूर चूल

१०९) या चुलीसाठी धुराडे आहे का ?

अ) होय ब) नाही

११०) घरातील धुरांमुळे तुम्हाला काही त्रास होतो का ?

अ) होय ब) नाही

१११) धुरामुळे काय त्रास होतो ?

अ) डोळे लाल होणे ब) कालांतराने कमी दिसणे

क) ठसका येणे ड) इतर

११२) तुमच्या घरातील केरकचऱ्याची व्यवस्था कशा प्रकारे लावता ?

अ) उकीरडा आहे ब) उघड्यावर केरकचरा फेकतो क) दारात टाकतो ड) इतर

११३) केरकचऱ्याच्या कुजण्यामुळे दुर्गंधी येते का ?

अ) होय ब) नाही

११४) या दुर्गंधीचा तुम्हाला काय त्रास होतो ?

अ) वासाने डोके दुखणे ब) मळमळणे क) उत्साह न वाटणे

ड) मुले आजारी पडतात इ) इतर

११५) तुमच्या घरातील सांडपाण्यासाठी गटार आहे का ?

अ) होय ब) नाही

११६) गटारी बांधीव आहेत का ?

अ) होय ब) नाही

११७) गटारी तुंबतात का ?

अ) होय ब) नाही

११८) गटारीमुळे काही त्रास होतो का ?

अ) दुर्गंधी ब) डास क) आरोग्य बिघाड ड) इतर

११९) केरकचरा उघड्यावर टाकल्याने पावसाळ्यात कोणता त्रास होतो ?

अ) पायाला खत लागणे ब) साथीचे रोग क) इतर

१२०) पायाला खत लागले की तुम्ही काय उपाय करता ?

अ) काजूच्या बियाचे तेल लावणे ब) मेणबत्तीचे मेण लावणे

क) मलम लावणे ड) इतर

१२१) तुमच्या भागात येणारे साथीचे रोग कोणते ?

अ) ताप ब) सर्दी क) कॉलरा ड) इतर

१२२) तुमच्या घरी जनावरे आहेत का ?

अ) आहेत ब) नाहीत

१२३) जनावरासाठी गोठा बांधीव आहे का ?

अ) आहे ब) नाही

१२४) गोठा घरापासून लांब आहे की घरात आहे ?

अ) घरात आहे ब) घरापासून लांब आहे क) शेतात आहे

१२५) गोठ्यातील मूत्राची सोय कशा प्रकारे केली आहे ?

अ) गटारीत सोडणे ब) भरून टाकणे क) साचणे ड) इतर

१२६) गोठ्यातील शेणाची सोय कशा प्रकारे केली आहे ?

अ) परसात खतासाठी खड्डा ब) गोबरगॅस क) शेणी

ड) इतर

१२७) गोठ्यातील शेण, मूत्राचा काय त्रास होतो ?

अ) डास ब) दुर्गंधी क) इतर

१२८) गोठ्याच्या स्वच्छतेसाठी कोणते उपाय करता ?

अ) नेहमी स्वत्छता

ब) डासनिर्मूलन पावडर

क) इतर

१२९) तुमच्या स्थानिक परिसरातील नदीला पूर येतो का ?

अ) होय

ब) नाही

१३०) पूरामुळे तुमच्या शेतीचे नुकसान होते का ?

अ) होय

ब) नाही

१३१) पुरामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानावर कोणता उपाय करता ?

अ) ग्रामपंचायतीकडून पाहणी

ब) ग्रामपंचायतीकडून नुकसान भरपाई

क) इतर

## परिशिष्ठ - 'ब'

## निरिक्षणसूची

एम्.फिल्. विद्यार्थिनीने करावयाच्या निरिक्षणासाठी निरिक्षणसूची

१) पाण्याच्या हौदाजवळ दलदल आहे का ?

| ० | १ | २ | ३ ४ |
|---|---|---|---|
| जास्त दलदल, पाणी, चिखल | चिखल | कमी चिखल | कमी दलदल नाही दलदल |

दलदलीची कारणे : १) पाण्याचा जास्त वापर

२) सांडपाण्याला योग्य मार्ग नाही, साठून रहाते.

२) गावातील नळांना तोटी आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| सर्व खाजगी नळांना तोटी नाही | बऱ्याच नळांना तोटी नाही | काही नळांना तोटी नाही | क्वचित नळांना तोटी नाही | सर्व नळांना तोटी आहे |

नळांना तोटी नसण्याची कारणे : १) नळ्याच्या तोटीतून बारीक पाणी येते.

३) नळाच्या पाण्यामुळे गावात अस्वच्छता आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| पाणी साचून रस्त्यावरून पाणी वहाते | बऱ्याच ठिकाणी अस्वच्छता | काही ठिकाणी अस्वच्छता | क्वचित ठिकाणी अस्वच्छता | स्वच्छता आहे |

अस्वच्छतेची कारणे : १) नळाला तोटी नसल्याने सतत पाणी वहाते

२) पाणी साचल्यामुळे

३) पाण्याला गटार नाही.

४) जनावरांमुळे घरचा परिसर अस्वच्छ आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| सर्व घरात शेणाचा मूत्राचा वास, डासांचा उपद्रव | बरीच घरे अस्वच्छ | काही घरे अस्वच्छ | क्वचित ठिकाणी घरे अस्वच्छ | गोठा बांधीव म्हणून स्वच्छता |

अस्वच्छेतेची कारणे : १) मलमूत्राचा मार्ग बांधीव नाही.

२) पाण्याचा वापर कमी

३) स्वच्छता नाही

४) उकीरडा घराजवळच

५) घरांना धुराडी आहेत का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| जुन्या घरांना धूर जाण्याची सोय नाही | बऱ्याच घरांना धुराडी नाहीत | काही घरांना धुराडी नाहीत | क्वचित घरांना धुराडी नाहीत | नवीन घरांना धुराडी आहेत |

धुराडी नसण्याची कारणे : १) जुनी घरे आहेत.

२) अज्ञान, जागरूकता कमी.

६) नदीजवळ अस्वच्छता आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| जनावरे धुणे, सर्वप्रकारचे धुणे, रक्षा विसर्जन | बऱ्याच प्रमाणात पाणी प्रदूषण | काही प्रमाणात पाणी प्रदूषण | कमी प्रमाणात पाणी प्रदूषण | प्रदूषण नाही |

पाणी (नदी) प्रदूषण कारणे : १) स्मशानभूमी नदीजवळ

२) उकीरडा नदीजवळ

३) शेती जवळच त्यामुळे खते व कीटकनाशके वाहून येतात.

४) गावातील सांडपाणी

७) हागणदारीमुक्त गाव आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| शौचालय नाही | बऱ्याच ठिकाणी उघड्यावर संडास करतात | काही ठिकाणी शौचालय सोय | क्वचित ठिकाणी उघड्यावर संडास करतात | प्रत्येकाकडे शौचालय आहे |

हागणदारीमुक्त गाव नसण्याची कारणे :

१) प्रत्येक घरी शौचालय नाही.

२) लहान मुले शौचालयाचा वापर न करता उघड्यावर बसतात.

८) आधुनिक इंधन साधने उदा. सौरबंब, सौर चूल यांचा वापर आहे का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अजिबात नाही | बऱ्याच ठिकाणी नाही | काही ठिकाणी आहे | क्वचित ठिकाणी आहे | सर्व ठिकाणी आहे |

अधुनिक इंधन साधने नसण्याचे कारण : १) अर्थिक परिस्थिती

२) सौरइंधन जागरूकता कमी

९) गावात बोअर आहेत का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| अजिबात नाहीत | बऱ्याच ठिकाणी नाही | काही ठिकाणी आहे | क्वचित ठिकाणी आहे | सर्व ठिकाणी आहे |

बोअर नसण्याची कारणे : १) अर्थिक परिस्थिती

२) पाणी भरपूर असल्याने गरज नाही

३) जागा नाही

४) ग्रामपंचायतीमार्फत बोअर मारले नाहीत.

१०) गावात बांधीव विहिरी आहेत का ?

| ० | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| सर्व विहिरी साध्या आहेत | बऱ्याच साध्या विहिरी आहेत | काही बांधीव आहेत | क्वचित विहिरी साध्या आहेत | सर्व विहिरी बांधीव आहेत |

कारणे : १) अर्थिक परिस्थिती नसल्याने साध्या विहिरी.

## परिशिष्ठ - 'क'

## विविध विभागवार खात्यांना द्यावयाची प्रश्नावली

### सामाजिक वनीकरण विभाग

प्राथमिक माहिती :

१. वनीकरण खात्याची सुरूवात किती साली झाली ?

२. वनीकरण खात्याची उद्दिष्ट्ये कोणती आहेत ?

३. वनीकरण विभागातील अधिकारी कर्मचारी माहिती.

४. वनीकरण विभागाचे अहवाल किंवा माहिती पुस्तक.

### प्रश्नावली

१. मडिलगे बु॥ परिसरातील वनीकरणाचे क्षेत्र किती आहे ?

२. मडिलगे खुर्द परिसरातील वनीकरणाचे क्षेत्र किती आहे ?

३. कलनाकवाडी परिसरातील वनीकरणाचे क्षेत्र किती आहे ?

४. या वनीकरणात कोणकोणत्या वनस्पतींची लागवड करता ?

५. चंदन, सागवान अशा झाडांना संरक्षण कशा प्रकारे देता ?

६. औषधी वनस्पती आहेत काय ? होय / नाही

७. हे वनीकरण कुणाकडून करून घेता ?

८. या वनीकरणाची देखभाल कोण करतो ?

९. या जंगलाची मालकी कुणाची आहे ?

१०. या वनीकरणातून मेलेल्या वनस्पतींच्या ठिकाणी पूनर्लागवड करता का ?

११. वनीकरणाचा आढावा किती कालावधीने घेता ?

१२. वनीकरणाच्या कायद्याची नोंद असते का ?

१३. वनीकरणाच्या कायद्याची अंमलबजावणी करता का ?

१४. वनीकरणाची योग्य जोपसना व संरक्षण होते काय ?

१५. पर्यावरण संरक्षण व संवर्धन ही आजची गरज यातून साकारते का ?

१६. चांगले काम करणाऱ्या वनरक्षकाला/वनकर्मचाऱ्याला बक्षिस/पुरस्कार देवून प्रेरणा निर्माण करता का ?

## जलसिंचन विभाग

प्राथमिक माहिती :

१. जलसिंचन विभागाची सुरूवात

२. जलसिंचन विभागाची उद्दिष्टये कोणती ?

३. जलसिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग

४. जलसिंचन विभागाचे अहवाल किंवा माहिती पुस्तिका

## प्रश्नावली

१. मडिलगे बु।। गावाला पाणीपुरवठा कशाप्रकारे करता ?

२. मडिलगे खुर्द परिसराला पाणी पुरवठा कशाप्रकारे करता ?

३. कलनाकवाडी परिसराला पाणी पुरवठा कशाप्रकारे करता ?

४. पाणी पुरवठ्यासाठी कर्मचारी पुरेसे आहेत का ?

५. या सर्व परिसराला पाण्याचा योग्य पुरवठा होतो का ?

६. या परिसरात पाणी टंचाई भासते का ?

७. ही पाणी टंचाई का भासते ?

८. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी काही उपाय या विभागामार्फत राबविले आहेत का ?

९. सरकारी योजना राबविता का ?

१०. गावात पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा यासाठी काही कार्यक्रम घेता का ?

११. शेतीसाठी पाणीपुरवठा कशाप्रकारे करता ?

१२. या परिसरातील लोकांची तुमच्या पाणीपुरवठ्यासंदर्भाच्या चांगल्या/वाईट प्रतिक्रियांची नोंद आहे का ?

१३. लोकांच्या प्रतिक्रियानुसार तुमच्या कामात बदल करून त्यांना सुविधा प्राप्त करून देता का ?

## ग्रामपंचायत

प्राथमिक माहिती :

१. ग्रामपंचायतीची स्थापना

२. ग्रामपंचायतीची उद्दिष्ट्ये

३. ग्रामपंचायतीतील अधिकारी व सदस्यांची माहिती

४. ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग

५. ग्रामपंचायतीचे अहवाल किंवा माहिती पुस्तिका

## प्रश्नावली

१. तुमच्या गावचे भौगोलिक क्षेत्र किती आहे ?

२. तुमच्या गावचे जंगलक्षेत्र किती आहे ?

३. तुमच्या गावचे शेतीक्षेत्र किती आहे ?

४. तुमच्या गावाला पाण्याचे स्त्रोत कोणते आहेत ?

५. गावाला पाणीपुरवठा कशाप्रकारे करता ?

६. पाण्याच्या टाकीची क्षमता किती आहे ?

७. संपूर्ण परिसर पाणीपुरवठ्याचा लाभ घेतो का ? काही भाग पाणीपुरवठ्यापासून वंचित आहे का ?

८. पाण्याच्या शुध्दीकरणासाठी कोणत्या पध्दती वापरता ?

९. पाण्याची टाकी किती दिवसांनी धुता ?

१०. जलशुध्दीकरणासाठी कोणती औषधे वापरता ?

११. गावातील सांडपाण्याच्या सोयीसाठी कोणत्या योजना राबविल्या आहेत ?

१२. गटारी बांधिव आहेत का ?

१३. गावात एकूण विहिरी किती आहेत ?

१४. त्या विहिरी कुणाच्या मालकीच्या आहेत ?

१५. बांधीव विहिरी किती व साध्या विहिरी किती आहेत ?

१६. ग्रामपंचायतीमार्फत बोअर मारले आहेत का ?

१७. बोअरच्या पाण्याचा वापर केव्हा करता ?

१८. पावसाळ्यात गावाचे आरोग्यासाठी संरक्षणात्मक उपाय करता का ? उदा. किटकनाशके फवारणे, पाण्यात औषधांचा वापर इ.

१९. ग्रामस्वच्छता अभियान सारख्या योजना राबविल्या का ?

२०. जलसंधारणाच्या काही योजना राबविल्या का ?

२१. पाणी टंचाईच्या वेळी कोणती सोय करता ?

२२. गावात खाण उद्योग आहे का ? कोणाच्या मालकीचा आहे ?

२३. त्या खाण व्यवसायाचा गावाला तोटा होतो का ?

२४. पंचायत समितीमार्फतच्या योजना गावातील लोकांपर्यंत पोहोचवता का ? उदा. निर्धूर चूल, औषध पंप, शिलाई मशिन, अधुनिक बी-बीयाणे, खते इ.

२५. पर्यावरण संरक्षण, संवर्धन काळाची गरज यासाठी झाडांचे महत्त्व, योजना, दिनसाजरे करणे, सभा बोलावणे व त्यातून प्रबोधन करणे, असे कार्यक्रम करता का ?

२६. तुमच्या गावाने काही वैशिष्ट्यपूर्ण कार्यकरून बक्षिस किंवा सन्मान मिळविला आहे का ?

## पंचायत समिती विभाग

प्राथमिक माहिती :

१. पंचायत समितीची स्थापना

२. पंचायत समितीची उद्दिष्ट्ये

३. पंचायत समितीचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी वर्ग

४. पंचायत समितीचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी वर्ग

५. पंचायत समितीचे अहवाल, माहिती पुस्तिका

## प्रश्नावली

१. मडिलगे बु।।, मडिलगे खुर्द, कलनाकवाडी या परिसरातील नदीचा उगम कोठे आहे ?

२. या नदीची लांबी, रूंदी किती आहे ?

३. पंचायत समितीच्या योजना गावापर्यंत पोहोचतात का ? सर्व गावात या योजनांचा लाभ घेतला जातो का ? उदा. औषध पंप, निर्धूर चूल, खते, संकरित बी-बीयाणे इ.

४. अधुनिक पध्दतीने शेती करणे, त्यासाठी औजारांची माहिती, पुरवठा, खते, संकरीत बियाणे यांचा वापर याबाबत मार्गदर्शनपर कार्यक्रम घेता का ?

५. तुम्ही पुरविलेल्या योजनांचा कार्याचा आढावा प्रत्येक गावातून घेता का ? नोंदी आहेत का ?

## पशुवैद्यकीय केंद्र

प्राथमिक माहिती :

१. पशुवैद्यकीय केंद्राची सुरूवात.

२. पशुवैद्यकीय केंद्राची उद्दिष्ट्ये.

३. पशुवैद्यकीय केंद्रातील अधिकारी व कर्मचारी.

४. अनुदान योजना कोणत्या व कुणासाठी आहेत ?

५. ग्रामविकास योजना कोणत्या ?

६. पशुवैद्यकीय केंद्राचा अहवाल किंवा

## प्रश्नावली

१. तुमच्या या पशुवैद्यकीय केंद्रामार्फत कोणकोणत्या सुविधा या परिसरातील लोकांना उपलब्ध करून देता ?

२. मडिलगे बु॥, मडिलगे खुर्द, कलनाकवाडी या परिसरातील सर्व ठिकाणी तुम्ही प्रत्यक्ष जावून भेट देता का ?

३. या परिसरासाठी कोणते दिवस निश्चित केले आहेत ?

४. संकरीत, जनावरांचा लोकांनी लाभ घ्यावा यासाठी काही सवलत योजना राबविता का?

५. या भागात पाळीव प्राण्यांना होणारे सर्वसामान्य रोग / विकार कोणते ?

म्हैस - गाय - बैल - शेळी -

६. या रोगांना जनावरे बळी पडणार नाहीत यासाठी काही लसीकरण आहे का ?

७. जनावरांचे आरोग्य व लोकांचे उत्पन्नवाढ यांचा चांगला समन्वय साधण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम करता का ?

८. अधुनिक पशुखाद्य कोणते आहेत ? त्यांचा वापर कशाप्रकारे करावा ? त्याचा फायदा काय ? या माहितीचा लाभ लोक कितपत घेतात ? याच्या नोंदी ठेवल्या आहेत का ?

९. सुदृढ जनावर, जास्त दूध देणारे जनावर यांच्या स्पर्धा आयोजित करून पशुवैद्यकीय विभागामार्फत प्रोत्साहन, बक्षिस देता का ?

# परिशिष्ठ - 'ड'

## पर्यावरण जाणीव जागृती चाचणी

पूर्ण नाव - एकूण गुण - ५०

वेळ : १ तास दि.

सूचना - १) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

३) योग्य पर्यायासमोर अशी खूण करा.

वनसंपदा

१) तुमच्या स्थानिक परिसरामध्ये इमारतीसाठी सहज उपलब्ध होणारी व आर्थिकदृष्ट्या परवडणारी वनस्पती कोणती ?

(अ) निलगिरी (ब) सागवान (क) शिसव (ड) सावर

२) तुमच्या स्थानिक परिसरातील 'एडस्' या रोगावरील उपयुक्त वनस्पती कोणती ?

(अ) आडुळसा (ब) बेहडा (क) शेवगा (ड) सूर्यफूल

३) तुमच्याा स्थानिक परिसरातील जळणासाठी कोणती वनस्पती वापरणे गरजेचे आहे ?

(अ) बाभूळ (ब) उंबर (क) फणस (ड) सागवान

४) किसान रोपवाटिकेच्या अंतर्गत रोपांचा पुरवठा व रोपनिर्मितीसाठीची आर्थिक मदत पुढीलपैकी कोणत्या संस्थेमार्फत केली जाते ?

(अ) शासनाचा सामाजिक वनीकरण विभाग (ब) ग्रामपंचायत (क) खाजगी रोपवाटिका (ड) पंचायत समिती

५) तुमच्या स्थानिक परिसरात शेतीमध्ये पुढीलपैकी कोणते आधुनिक शेती प्रकल्प राबवितात?

(अ) सुधारित ऊस बेणे प्लॉट (ब) कोरफड शेती (क) गांडूळ शेती (ड) ग्रीन हाऊस

## प्राणीसंपदा

६) तुमच्या स्थानिक परिसरातील पशुपालनामध्ये जास्त दूध देणारी म्हैशीची संकरित जात कोणती ?

(अ) पंढरपुरी (ब) मुऱ्हा (क) जाफराबादी (ड) म्हैसाना

७) जादा अंडी देणारी कोंबडीची संकरित जात कोणती ?

(अ) देशी (ब) लेगहॉर्न (क) रेड लेगहॉर्न (ड) व्हाइट लेगहॉर्न

८) तुमच्या स्थानिक परिसरातील कोंबड्यांना पुढीलपैकी कोणता रोग होतो ?

(अ) बर्ड फ्ल्यु (ब) चिकनगुण्या (क) फोड्या (ड) यापैकी नाही

९) तुमच्या स्थानिक परिसरात पुढीलपैकी कोणता व्यवसाय प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात करतात ?

(अ) कुक्कुटपालन (ब) दुग्धव्यवसाय (क) नोकरी (ड) मत्स्यव्यवसाय

१०) स्थानिक परिसरातील दूध देणाऱ्या जनावरांना त्यांच्या शरीरासाठी व दूधासाठी प्रतिदिनी अनुक्रमे किती प्रमाणात पशुखाद्य देणे गरजेचे आहे ?

(अ) २ किलो ४०० ग्रॅम (ब) १ किलो ५०० ग्रॅम (क) २ किलो ३०० ग्रॅम

(ड) १ किलो ४०० ग्रॅम

## इंधने

११) इंधनाच्या संदर्भात शासनाकडून स्थानिक पातळीवर पुढीलपैकी कोणती योजना राबवितात ?

(१) निर्धूर चूल (२) गोबरगॅस (३) शौचालय

(अ) (१) व (२) (ब) फक्त (२) (क) फक्त (३) (ड) वरील सर्व

१२) गोबरगॅसमध्ये मुख्यतः कोणता वायू तयार होतो ?

(अ) मिथेन (ब) ऑक्सिजन (क) सल्फर डायऑक्साइड (ड) अमोनिया

१३) तुमच्या स्थानिक परिसरातील 'आदर्श इंधन' म्हणून पुढीलपैकी कोणते इंधन उपयुक्त आहे ?

(अ) लाकूड (ब) रॉकेल (क) शेणी (ड) मिथेन

१४) स्थानिक परिसरातील घरगुती वापरासाठी कोणत्या इंधनापासून जास्त उष्णता मिळते ?

(अ) रॉकेल (ब) लाकूड (क) गोबरगॅस (ड) शेणी

१५) तुमच्या स्थानिक परिसरात घरगुती वापरासाठी पुढीलपैकी सहज उपलब्ध होणारे इंधन कोणते ?

(अ) रॉकेल (ब) लाकूड (क) पेट्रोल (ड) एल्.पी.जी.

जलसंपदा

१६) तुमच्या स्थानिक परिसरातून वाहणाऱ्या नदीचा उगम कोठे झाला आहे ?

(अ) तांब्याची वाडी (ब) काळम्मावाडी (क) बसरेवाडी (ड) फये

१७) तुमच्या स्थानिक परिसरात ग्रामपंचायतीमार्फत पाणीशुद्धीकरणासाठी पुढीलपैकी कोणते औषध वापरतात ?

(अ) पोटॅशियम परमँगेनेट (ब) तुरटी (क) टी.सी.एल. (ड) क्लोरीन

१८) सध्याची सार्वत्रिक जलसमस्या लक्षात घेता स्थानिक परिसरातील शेतीसाठी कोणत्या पद्धतीने पाणी देणे गरजेचे आहे ?

(अ) पाट पद्धती (ब) तुषारसिंचन पद्धती (क) मोटारीच्या सहाय्याने पाणी देणे (ड) यापैकी नाही

१९) नैसर्गिकरित्या कोणत्या पाण्यात जास्त क्षार असण्याची शक्यता आहे ?

(अ) बोअर (ब) नदी (क) नळाचे पाणी (ड) तळ्याचे पाणी

२०) तुमच्या स्थानिक परिसरातील नदी पुढे जावून कोणत्या नदीला मिळते ?

(अ) चिकोत्रा (ब) दूधगंगा (क) कृष्णा (ड) पंचगंगा

२१) स्थानिक परिसरातील विहिरींचे संरक्षण पुढीलपैकी कोणत्या प्रकारे कराल ?

(१) विहिरीवर शेड मारू (२) विहिरीला आतून पायऱ्या ठेवू

(३) विहिरीला बाहेरून पायऱ्या ठेवू

(अ) १ व २ (ब) १ व ३ (क) २ व ३ (ड) १, २ व ३

मृदासंपदा

२२) तुमच्या स्थानिक परिसरातील मुरमाड जमिनीचा वापर कोणत्या पिकासाठी करतात ?

(अ) भुईमूग (ब) भात (क) ऊस (ड) सोयाबीन

२३) आपल्याकडे प्रामुख्याने घेतल्या जाणाऱ्या भात पिकासाठी आवश्यक जमीन कोणत्या प्रकारची असते ?

(अ) गाळाची (ब) मुरमाड (क) चुनखडीयुक्त (ड) यापैकी नाही

२४) तुमच्या स्थानिक परिसरातील नदीकाठच्या कसदार जमिनीतून मुख्यतः कोणते पीक घेतात ?

(अ) भुईमूग (ब) ऊस (क) सोयाबीन (ड) सूर्यफूल

२५) जमिनीला संपत्ती का म्हणतात ?

(अ) परंपरेनुसार (ब) वेगवेगळे उद्योगधंदे तिच्यावर अवलंबून आहेत

(क) जमिनीमुळे आसरा मिळतो

(ड) जमिनीतून पीक घेता येते व पैसे मिळतात

२६) शेतीसाठी जमीन वापराबाबत पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

(अ) नवा दृष्टीकोण व नवे तंत्रज्ञान वापरून शेती करणे फायदेशीर आहे.

(ब) शेतीचे प्लॉट पाडून विकणे फायदेशीर आहे.

(क) शेती व्यवसायातून कोणत्याही प्रकारचा फायदा होत नाही.

(ड) शेती करणे बंद करून शहराकडे व्यवसायासाठी गेले पाहिजे.

## लोकसंख्या आणि पर्यावरण

२७) तुमच्या स्थानिक परिसरातील लोकसंख्यावाढीचे प्रमुख कारण कोणते ?

(अ) मुलग्याचा हट्ट (ब) ऑपरेशनची भिती (क) निरक्षरता व अडाणीपणा

(ड) (अ) व (क)

२८) कुटुंबात जास्त मुले असल्याने कोणते तोटे होतात ?

(अ) घरात जागा कमी (ब) गरजा भागत नाहीत (क) रोगराईला आमंत्रण

(ड) वरील सर्व

२९) माणसांच्या गर्दीमुळे खालीलपैकी कोणता परिणाम होतो ?

(अ) हवेचा दाब वाढतो (ब) हवेला जागा उरत नाही

(क) हवेत कार्बन डायऑक्साइड वाढतो

(ड) हवेत ऑक्सिजन वाढतो

३०) लोकसंख्येला आळा घालण्यासाठी तुम्ही काय कराल ?

(अ) लोकजागृती (ब) प्रतिबंध (क) शिक्षा करणे

(ड) जबरदस्तीने शस्त्रक्रिया करायला लावू

३१) कुटुंबात जास्त मुले असल्याने लहान मुलांच्या वाढीवर कोणता परिणाम होतो ?

(१)आईवडिलांना सर्व मुलांकडे लक्ष देता येत नाही

(२) मुलांच्या शिक्षणाची आबाळ होते

(३) सर्व मुले कामाला जावून पैसे मिळवून आणतात.

(अ) १ व २ (ब) १, २ व ३ (क) फक्त २ (ड) वरील सर्व

## आरोग्य आणि पर्यावरण

३२) तुमच्या स्थानिक परिसरातील लोकांना वारंवार कोणता आजार होताना दिसतो ?

(अ) ताप/सर्दी/खोकला (ब) कावीळ (क) संधीवात (ड) टायफॉइड

३३) तुमच्या स्थानिक परिसरातील लोकांचे पुढीलपैकी मुख्यतः कोणत्या कारणामुळे आरोग्य बिघडते ?

(अ) ध्वनीप्रदूषण (ब) हवाप्रदूषण (क) पाणीप्रदूषण (ड) मृदाप्रदूषण

३४) स्थानिक परिसरातील वेगवेगळ्या रोगांचा प्रादुर्भाव होण्यासाठी पुढीलपैकी कोणता घटक कारणीभूत ठरतो ?

(अ) पर्जन्य (ब) हवा (क) तापमान (ड) यापैकी नाही

३५) रोगजंतूमुळे दूषित झालेले पाणी निर्जंतूक कसे कराल ?

(अ) तुरटी फिरवून (ब) स्वच्छ कपड्याने गाळून (क) निवळून

(ड) पाणी कमीत कमी १५ मिनिटे उकळून

३६) तुमच्या परिसरामध्ये शुद्ध पाणी मिळण्याचे मार्ग कोणते ?

(अ) पावसाचे पाणी (ब) नळाचे पाणी (क) बोअरचे पाणी (ड) नदीचे पाणी

पर्यावरणीय समस्या (मानवनिर्मित समस्या)

३७) स्थानिक परिसरात होणाऱ्या गणेशोत्सवातील ध्वनीप्रदूषणामुळे पुढीलपैकी कोणते आजार होतात ?

(अ) सर्दी व डोकेदुखी (ब) अपचन व निद्रानाश (क) कावीळ व कॉलरा (ड) ताप

३८) तुमच्या स्थानिक परिसरातील नदी पुढे ३० किमी गेल्यानंतर तिचे प्रदूषण पुढीलपैकी कोणत्या कारखान्यामुळे होते ?

(अ) दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री

(ब) सदाशिवराव मंडलिक सहकारी साखर कारखाना लि. हमिदवाडा

(क) अखिल भारतीय इंदिरा गांधी महिला साखर कारखाना लि. तांबाळे

(ड) आजरा सह. साखर कारखाना

३९) तुमच्या स्थानिक परिसरातील चुलीमुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी तुम्ही काय केले पाहिजे ?

(अ) निर्धूर चुलीचा वापर (ब) वाळलेली लाकडे (क) जळणासाठी बाभळीचा वापर

(ड) ब व क

४०) रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीत कोणता बदल होतो ?

(अ) जमिनीतील जीवाणू मरतात (ब) तणांचा नाश होतो (क) जमिनीची प्रत सुधारते

(ड) जीवाणूंची संख्या वाढते.

४१) तुमच्या स्थानिक परिसरातील जमिनीची धूप मुख्यतः कशामुळे होते ?

(अ) जनावरांची हालचाल (ब) जंगलतोडीमुळे (क) वृक्षलागवड

(ड) निलगिरी लागवड

नैसर्गिक आपत्ती

४२) तुमच्या स्थानिक परिसरातील नदीला वारंवार पूर येण्याचे मुख्य कारण कोणते ?

(अ) मुसळधार पाऊस (ब) नदीचे अरूंद पात्र (क) बारमाही नद्या

(ड) धरणाचे पाणी सोडणे

४३) तुमच्या स्थानिक परिसरामध्ये वारंवार येणारी पर्यावरणीय समस्या कोणती ?

(अ) दुष्काळ (ब) पूर (क) भूकंप (ड) ज्वालामुखी

४४) तुमच्या स्थानिक परिसरात येणाऱ्या पूराचा महत्त्वाचा दुष्परिणाम कोणता ?

(अ) पिकांचे नुकसान (ब) वाहतूक गैरसोय (क) घरांची पडझड (ड) जिवित हानी

४५) स्थानिक परिसरातील पूर नियंत्रणासाठी तुम्ही काय कराल ?

(अ) वृक्ष लागवड (ब) पर्जन्यावर नियंत्रण मिळवणे (क) नद्यांना बांध घालणे

(ड) अ व क

पर्यावरण संरक्षण व संवर्धन

४६) तुमच्या गावचे पुढीलपैकी कोणते वैशिष्ट्ये आहे ?

(अ) हागणदारीमुक्त गाव (ब) लोकसंख्यानियंत्रित गाव (क) व्यसनमुक्त गाव

(ड) यापैकी नाही

४७) तुमच्या स्थानिक परिसरातील पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचे मुख्य कारण कोणते ?

(अ) विविध वनस्पतींच्या संख्येत वाढ (ब) प्राण्यांच्या संख्येत वाढ

(क) मानवाचा पर्यावरणात हस्तक्षेप (ड) एकाच प्रकारची वृक्षलागवड

४८) मडिलगे बु॥ गावाला स्वच्छतेसंदर्भात कोणते बक्षिस मिळाले आहे ?

(अ) राजर्षी शाहू अभियान (ब) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

(क) साक्षरता अभियान (ड) वनश्री पुरस्कार

४९) या ग्रामस्वच्छता अभियानाचे प्रमुख वैशिष्ट्ये कोणते ?

(अ) ग्रामस्वच्छता (ब) वैयक्तिक स्वच्छता (क) पाणी स्वच्छता (ड) वरील सर्व

५०) स्थानिक परिसरातील चुलींमुळे होणाऱ्या प्रदूषणासंबंधी तुमची भूमिका कोणती ?

(अ) निर्धूर चुलीचा फायदा इतरांना सांगू

(ब) शासनाचे अनुदान मिळविण्याच्या पद्धती लोकांना सांगू

(क) कुंभारांना शासनाकडून प्रशिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करू

(ड) चुलीचा वापर करू नये असे सांगू

परिशिष्ट 'इ'

# इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक पर्यावरण जाणीवजागृती संच

(मडिलगे बु ॥ ता. भुदरगड, जि. कोल्हापूर)

श्रीमती निंबाळकर प्रतिभा शामराव

एम्. फिल. विद्यार्थिनी

शिक्षणशास्त्र विभाग

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

डिसेंबर २००६.

# मनोगत

एम्. फिल. पदवीच्या अंशत: पूर्तीच्या हेतूने इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक पर्यावरणाच्या संदर्भात ''जाणीवजागृती संचाची निर्मिती - एक अभ्यास'' हा शोधनिबंध डॉ. गीतांजली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला. या शोधकार्याचे प्रस्तुत पर्यावरण जाणीव जागृती संच हे फलित आहे.

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या अधुनिक युगात मानवाने यशाची अत्युच्च्य शिखरे गाठण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच निसर्गावर विजय मिळविण्याचा प्रयत्न मानव करतो आहे पण हे करताना या निसर्गाकडूनच अनेकवेळा नैसर्गिक आपत्तीतून, पूर, ज्वालामुखी, भूकंप याद्वारे मानवाला सणसणीत चपराक बसते व अपरिमित जिवित व वित्तहानी होते. अशा प्रकारच्या अनेक पर्यावरणीय समस्या आज प्रत्येक राष्ट्रापुढे उभ्या आहेत. व याचे एकमेव कारण म्हणजे निसर्गात मानवी हस्तक्षेप होय. आज या समस्येला तोंड देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर, राज्य स्तरावर अनेक उपक्रम, कार्यशाळा राबवल्या जातात. पण स्थानिक पातळीवर पर्यावरणाच्या जाणीवजागृतीबाबत काय स्थिती आहे हे पाहण्याच्या हेतूने हे संशोधन केले गेले व यातूनच हा संच अस्तित्वात आला.

स्थानिक पर्यावरणात अनेक प्रकारच्या उपयुक्त वनस्पती आहेत, प्राणी आहेत, इंधनस्त्रोत आहेत, जलसंपदा आहे, लोकसंख्येतील काही व्यक्ती पर्यावरण संवर्धनाच्या प्रसारात प्रभावी घटक म्हणून कार्य करु शकतात. आरोग्यासाठी या स्थानिक परिसरातील अनेक घटक चांगल्या प्रकारे उपयुक्त होवू शकतात. म्हणून पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करणे काळाची गरज आहे हे आजच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी स्थानिक पर्यावरणाबाबत जाणीवजागृती करण्यासाठी या संचाची निर्मिती केली आहे व या संचातून आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाचा किती मोठ्या प्रमाणात लाभ होवू शकतो हे लक्षात आणून देण्याचा प्रयत्न या पर्यावरण जाणीवजागृती संचातून केला आहे.

**श्रीमती निंबाळकर प्रतिभा शामराव**

# ऋणनिर्देश

प्रस्तुत पर्यावरण जाणीव जागृती संच सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. हा संच तयार करण्याची सुवर्णसंधी मला शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी उपलब्ध करुन दिली याबद्दल मी प्रथमत: त्यांचे आभार मानते.

या संचाच्या निर्मितीसाठी डॉ. पाटील जी. एस यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन.

शिक्षणशास्त्र विभागातील लाभलेले आदरणीय गुरुवर्य यामध्ये शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. येवले सी. एम्., प्रा. डॉ. पद्मिनी एम्. एस, डॉ. सप्रे एन. आर, डॉ. पाटणकर पी. एस, श्री. पाटील के. बी यांच्याकडून मला सतत प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

तसेच संच निर्मितीसाठी मार्गदर्शन केलेले व संच वेळेवर तपासून दिल्याबद्दल तज्ज्ञ डॉ. बाचूळकर, श्री. पाटील, श्री. लवटे, श्री. चौगले, श्री. सोनपेटकर यांचेही मी आभार मानते.

त्याचप्रमाणे या संशोधनात सहभागी स्थानिक लोक, इ. ८ वी चे विद्यार्थी, दौलत विद्यामंदिर मडिलगे बु॥ या शाळेचे मुख्याध्यापक, विविध विभागातील पदाधिकारी तसेच शिक्षणशास्त्र विभागातील कर्मचारी यांचेही मी आभार मानते. माझ्या घरच्या लोकांकडून मला सतत प्रेरणा व सहकार्य मिळाले त्यांचाही मी शतश: ऋणी आहे.

# स्थानिक पर्यावरण जाणीवजागृती संच

(मडिलगे बु।। ता. भुदरगड, जि. कोल्हापूर)

## प्रस्तावना

दौलत विद्यामंदीर मडिलगे, बु।। (ता. भुदरगड, जि. कोल्हापूर) या शाळेतील इ. ८ वी मध्ये मडिलगे बु।।, माळवाडी, गणेशनगर, मडिलगेखुर्द, कलनाकवाडी, माळवाडी या स्थानिक परिसरातून विद्यार्थी येतात.

मडिलगे गावाचा स्थानिक परिसर म्हणजे मडिलगे बु।।, मानवाडी, गणेशनगर, मडिलगे खुर्द, कलनाकवाडी, माळवाडी अशा सहा वाड्या होय. या गावच्या स्थानिक पर्यावरणाचा अभ्यास संशोधिकेने केला आहे.

प्रस्तुत संशोधनातून स्थानिक परिसरातील पर्यावरणाची काही वैशिष्ट्ये प्रामुख्याने दिसून आली. इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांना दिलेल्या जाणीवजागृती चाचणीतून त्यांना त्यापैकी बऱ्याच वैशिष्ट्यांची माहिती नसल्याचे दिसून आले. त्यांना या वैशिष्ट्यांची माहिती व्हावी व त्याचा उपयोग त्यांनी दैनंदिन जीवनात करावा इतरांना सांगावा तसेच शिक्षकांनाही ही माहिती अज्ञात असेल तर त्यांनाही ज्ञात होईल व अध्यापन करताना ती उपयुक्त ठरेल व वाचकांनाही याचा फायदा होईल यासाठी या जाणीवजागृती संचाची निर्मिती केली आहे. तसेच निलगिरी व सागवान अशा उपयुक्त वनस्पतींची माहिती दिली आहे. काही जंगली प्राण्यांची माहिती दिली आहे. या संचामध्ये सौरसाधने, स्थानिक परिसरातील नदीची माहिती, मृदासंपदांचे प्रकार व त्यांची माहिती, जलसंपत्तीच्या वापरामध्ये ठिबकसिंचन व तुषारसिंचन पध्दतीची माहिती जनावरांचे आरोग्य, पशुपालनासाठी व्यावसायिकसंधी, सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्याची व योजनांची माहिती इत्यादी संदर्भात माहिती दिली आहे.

# अनुक्रमणिका


१) वनसंपदा १ - १५

अ) इमारतीसाठी उपयुक्त वनस्पती

१) निलगिरी

२) सागवान

ब) औषधी वनस्पती

१) आपटा

२) सूर्यफूल

३) बेहडा

४) कोरफड

क) गवत प्रकार

१) मारवेल

२) काळी कुसळी

ड) फळझाडे

इ) सामाजिक वनीकरण खाते

२) प्राणीसंपदा १६ - २४

अ) जंगली प्राणी

१) साप

२) कोल्हा

३) रानडुक्कर

४) ससा

५) मोर

ब) पाळीव प्राणी

१) शेळी

२) गाय, म्हैस

३) **इंधने** २५ - २९

अ) निर्धूर चुल

ब) बायोगॅस

क) सौर साधने

१) सौर कंदिल

२) सौर बंब

३) सौर कुकर

४) **जलसंपदा** ३० - ३५

अ) नदी

ब) जलसंपत्तीचा वापर -

१) ठिबक सिंचन पध्दती

२) तुषार सिंचन पध्दती

५) **मृदा संपदा** ३६ - ४०

६) **लोकसंख्या व्यवसाय व पर्यावरण** ४१ - ४८

अ) लोकसंख्या जागृती

ब) पशुपालन व्यवसायसंधी

क) जनावरांचे आरोग्य

१) गोचिड ताप

२) बुळकांडी

ड) कुक्कुटपालन व्यवसाय

१) मानमोडी (राणीखेत)

इ) शेती व्यवसाय

१) ऊस बेणे प्लॉट

२) गांडूळशेती

७) **कृषी विभागाच्या केंद्र व राज्य पुरस्कृत काही योजना** ४९ - ५३

१) तुषार व ठिबकसिंचन तंत्रज्ञानाचा प्रसार.

२) रोजगार हमी योजनेतून फळ लागवडीसाठी शेतकऱ्याला राज्यशासनामार्फत मदत.

३) गांडूळखत निर्मितीसाठी उत्पादकांना भांडवली अर्थसहाय्य.

४) जैविक किटक नाशके निर्मितीसाठी उत्पादकांना भांडवली अर्थसहाय्य.

५) उद्यान पंडित पुरस्कार

८) **पर्यावरणीय आपत्ती - प्रदूषण व पूर** **५४ - ६२**

१) जलप्रदूषण व उपाय

१) आदर्श विहिर

२) हवा प्रदूषण व उपाय

१) बायोगॅस

३) भूप्रदूषण व उपाय

१) जैविक किटकनाशक - 'लिंबोळी अर्क'

२) गांडूळखत

४) ध्वनिप्रदूषण व उपाय

५) पूर व उपाय

# इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्थानिक पर्यावरण जाणीवजागृती संच

**(मडिलगे बु॥ ता. भुदरगड, जि. कोल्हापूर)**

## वन संपदा

मडिलगे गावाच्या स्थानिक परिसरामध्ये आढळणाऱ्या वनस्पतीमध्ये पुढील प्रकारच्या वनस्पती आहेत. वृक्ष - वड, पिंपळ, उंबर, निलगिरी, कडूलिंब, आंबा चिंच, बाभूळ, जांभूळ, सागवान, बेहडा, नारळ, फणस, सुबाभूळ, शेवगा, शिसव, गुलमोहर, रामफळ, सावर, धावडा, चंदन इ.

**मध्यम आकाराच्या वनस्पती : -**

अशोक, बेल, आवळी, बिब्बी, सुरु, केळी, पेरु, बांबू, लिंबू, सिताफळ, चिक्कू इ.

**झुडपे व लहान वनस्पती : -**

बोराटे, घाणेरी, तुळस, आले, शेंड, कोयनेल, कोरफड, रुई, निवडूंग.

**गवत : -**

दुर्वा, लव्हाळा, मारवेल, मुशी, बेर, दिनानाथ अंजनगवत, गिनी गवत, काळीकुसळी, करड, काँग्रेसगवत (गाजर गवत) यापैकी काही वनस्पतींची माहिती पुढे दिलेली आहे.


**अ) इमारतीसाठी उपयुक्त वनस्पती :**

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या तीन मूलभूत गरजा आहेत. अन्नासाठी माणूस वनस्पती व प्राण्यांवर अवलंबून असतो. वनस्पतीपासून मानवाला फक्त अन्नच मिळते असे नाही तर त्यापासून कापूस धागा पर्यायाने कापड मिळते. घर बांधणीसाठी लाकूड मिळते काही वनस्पतींचा औषध म्हणून उपयोग होतो. अशा या वनसंपदेबद्दल अधिक माहिती असणे गरजेचे आहे.

स्थानिक परिसरामध्ये म्हणजेच मडिलगे बु॥, मडिलगे खुर्द, कलनाकवाडी व सभोवतीच्या वाड्या वस्त्या या परिसरामध्ये अशा अनेक उपयुक्त वनस्पती आहेत. यापैकी काही वनस्पती इमारतीसाठी उपयुक्त आहेत. उदा. सुबाभूळ, फणस, निलगिरी, सागवान, शिसव इ.

मुलांनो ! निलगिरी, सागवान ही झाडे तुम्ही नेहमीच पाहता. आपल्या शाळेभोवतीसुध्दा ही झाडे आहेत होय ना ? या झाडांची महत्वपूर्ण माहिती तुम्हाला समजावी यासाठी निलगिरी व सागवानाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

निलगिरी



## निलगिरी

गेल्या काही वर्षात निलगिरीला वनशेतीमध्ये प्राधान्य मिळालेले आहे. हरियाना, पंजाब, उत्तरप्रदेश, सौराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक इ. भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर निलगिरीच्या रोपांची लागवड केली आहे. निलगिरीचे काही गुण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) पाने गळत नसल्याने सतत व जलद वाढ.

२) कमी पावसाच्या प्रदेशात वा निकृष्ट जमिनीवर तग धरण्याची क्षमता असते.

३) जास्त पाणी मिळाल्यास जलद वाढून पाण्याचा पुरेपुर उपयोग करुन घेण्याची क्षमता असते.

४) लाकूड तयार करण्याच्या प्रक्रियेत पाण्याचा योग्य व माफक उपयोग केला जातो.

५) इमारतीसाठी लाकूड (मध्यम दर्जाचे), सरपण तसेच कागद करण्यासाठी लगदा म्हणून उपयोगी होवू शकणारे लाकूड आहे.

६) कापल्यावर वा आगीने नुकसान झाल्यास नवीन फुटवे देण्याची क्षमता असते.

७) गुरे तोंड लावीत नाहीत.

८) कमी कष्टाची व सोपी मशागत असते.

९) रोगराई सहसा नाही, त्यमुळे सांभाळ करणे सोपे आहे.

वरील वैशिष्ट्ये लक्षात घेवूनच शेतकऱ्यांनी निलगिरीला आपलेसे करुन घेतले आहे. निलगिरीला चांगली जमीन व पाणी मिळाले तर चांगली वाढ होते आणि प्रतिवर्षी १० ते १५ घनमीटर एवढे उत्पादन होवू शकते. जमिनीचा कस कमी असल्यास किंवा पाण्याची सोय नसल्यास मिळणारे उत्पन्न ८ ते १० वर्षामध्ये केवळ ५ ते १० घनमीटर एवढेच मिळेल पण या क्षेत्रामध्ये दुसऱ्या प्रकारची इतर कोणतीही झाडे लावल्यास त्यापासून किंवा शेतीपासून एवढेही उत्पन्न निघेल याची शाश्वती नाही.

निलगिरीचे उत्पादन :

१) कागद कारखाने ८०० रु ते १२०० रु टन भावाने लगदा तयार करण्यासाठी लाकूड विकत घेतात.

२) इमारत मालाचा भाव ४००० रु प्रति घनमीटर आहे. हेक्टरी १०००० रु उत्पादन मिळते व फांद्या, शेंड्यापासून सरपण मिळते.

**निलगिरीबाबत गैरसमज :**

१) निलगिरी वृक्ष लावल्यामुळे त्या भागात अवर्षण पडते हा गैरसमज आहे.

२) निलगिरी लागवडीनंतर लगतच्या विहिरीच्या, तळ्याच्या पाण्याची पातळी खोल जाते व जमिन कोरडी होते असे सांगितले जाते परंतु याबाबत शास्त्रोक्त निष्कर्ष काढण्यात आलेला नाही.

३) निलगिरी वृक्षाखाली काही उगवत नाही हा आक्षेप आहे पण तसे नाही. निलगिरीचा पर्णसंभार माफक असल्याने सूर्यकिरण जमिनीपर्यंत येतात व त्याखाली गवतही वाढते. धारवाड जिल्ह्यात राणी बेन्नुर अभयारण्यात २५०० हरणे व ४० हजार मेंढ्या शेळ्या निलगिरीच्या जंगलात चरतात.

४) निलगिरीचे झाड इतरांपेक्षा जास्त पाणी वापरते हे म्हणणे योग्य नाही कारण निलगिरीच्या झाडाने वापरलेल्या एक लिटर पाण्यापासून जेवढे लाकूड तयार होते. तेवढे इतर कुठल्याही झाडापासून होत नाही.

म्हणूनच शेतकरी बंधूंनी अधिकाधिक निलगिरीची लागवड करावी असे अवाहन केले जात आहे.


## सागवान

सागवान हा अतिशय उत्कृष्ट इमारती लाकूड देणारा वृक्ष आहे. याच्या लाकडामध्ये असणारा चिवटपणा, काम करण्यासाठी असणारा सोपेपणा, आकर्षक रंग व पाण्यामध्ये अधिक काळ टिकून राहण्याची क्षमता या गुणवैशिष्ट्यामुळे सागवान इमारती लाकडासाठी उपयुक्त आहे.

याचे शास्त्रीय नांव "Tectona grandis" असे आहे. सागवान हा वृक्ष भारत, ब्रम्हदेश, थायलंड, जावा, सुमात्रा, मलाया इ. देशात आढळतो. महाराष्ट्रात गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, अमरावती, नांदेड, वर्धा, यवतमाळ तसेच पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, ठाणे, धुळे, नाशिक, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळतो.

सागाच्या उत्तम वाढीसाठी आणि लाकडाच्या चांगल्या प्रतिसाठी वार्षिक सरासरी पाऊस १२५० ते ३००० मि.मि. योग्य ठरतो. दुष्काळ, गारपीट व चक्रीवादळ अशा नैसर्गिक आपत्तीमुळे साग लागवडीचे नुकसान होवू शकते. साग वणव्यात इतर वनस्पतींच्या तुलनेने जास्त टिकाव धरु शकतो. सागाची लहान रोपे वणव्यात तग धरु शकतात. वरचा भाग वणव्यात नष्ट झाला तरी जमिनीलगत पुन्हा कोंब फुटतात.

सागवान



**साग उत्पन्न :**

पूर्ण वाढ झालेल्या एका सागाच्या झाडापासून स्थानिक परिस्थितीनुसार अंदाजे ३० ते ४० घनफूट इमारती लाकूड मिळू शकते. सध्या बाजारात सागाची प्रति घनफुट भाव ६०० रु च्या आसपास आहे. भविष्यकाळातील सागाची मागणी व सागाचा भाव याचा विचार करता सागलागवड करणे फायद्याचे ठरेले.

**सागवानाचे उपयोग :**

खांब, तुळ्या, दरवाजे, खिडक्यांच्या चौकटी, फळ्या, बॅटस अशा इमारत कामासाठी, जहाज बांधणीमध्ये सतत पाण्यात राहणाऱ्या भागासाठी , कोरीव काम, घरातील फर्निचर, शेतीऔजारे, ट्रकचे केबिन, खेळणी, कंगवे इ. अनेकविध उपयोगासाठी सागाचे लाकूड उपयोगी आहे.


विद्यार्थी मित्रहो, इतकी उपयुक्त माहिती वाचल्यानंतर तुमच्या शेतात निलगिरी सांगवानाची लागवड कराल ना ?अंह ! केलीच पाहिजे.

दुसऱ्या कंपन्यांमध्ये पैसे गुंतवण्यापेक्षा सागाला उपयुक्त अशी पडिक जमीन असल्यास पाणी देण्याची व्यवस्था असल्यास अशा शेतकऱ्यांनी स्वत:च सागाची लागवड करावी. यासाठी सामाजिक वनीकरण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या खाजगी पडिक जमिनीवर वृक्ष लागवड व कुरण विकास या योजनेअंतर्गत साग लागवड करण्यासाठी मजुरी २६४७ रू. व साहित्य पुरवठा २६९५ रू. असे एकूण ५३४२ रू. प्रति हेक्टरी अर्थिक सहाय्य मिळते. या योजनेखाली किमान २० गुंठे व कमाल ४ हेक्टर क्षेत्रावर लागवड करता येते. वनशेती शक्य नसेल तर सागाची काही झाडे शेताच्या बांधावर लावता येतात. साग लागवड तंत्र फारसे अवघड नसल्याने शेतकरी स्वत: स्वत:च्या शेतावर साग वृक्ष लावून भविष्यासाठी अर्थिक तरतूद करू शकतो.

ब) औषधी वनस्पती :

ग्रामीण परिसरामध्ये आपल्याला डॉक्टर लगेचच उपलब्ध होवू शकत नाही. रात्रीच्यावेळी इलाजासाठी बाहेर गावी जावे लागते. पण तुम्हाला माहित आहे का तुम्हीच तुमच्या घरातील व्यक्तींचे डॉक्टर होवू शकता. कस ? ते पुढील माहिती वरुन कळेलच.

# बहुगुणी आपटा



स्थानिक परिसरात खूप औषधी वनस्पती आहेत. कडूलिंब, आडूळसा, बेल, बेहडा, सूर्यफूल, निलगिरी, तुळस, शिकेकाई, लिंबू, दगडीपाला, दुर्वा, आघाडा, आळू, आले, एरंडेल, शेंड, अशोक, आवळा, आंबाडा, आपटा या महत्वाच्या औषधी वनस्पती आढळतात. यापैकी काही औषधी वनस्पतींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

विद्यार्थी मित्र हो ! आपण 'दसरा' सणाच्या वेळी सोने म्हणून कोणत्या वनस्पतींची पाने एकमेकांना देतो माहित आहे ना ? अगदी बरोबर 'आपटा' या वनस्पतीची पाने. पण दरवर्षी आपण या वनस्पतीची तोड करतो व सोने म्हणून दसऱ्याच्यावेळी ते मोठ्या प्रमाणात लुटतो. पण पुन्हा या वनस्पतीची लागवड करावी अस आपल्या मनात कधी आले का रे ? नाही ना, पण ही वनस्पती अशीच वापरुन संपून गेली की आपण एका औषधी वनस्पतीला मुकणार आहोत. कसे काय ? वाचा तर मग 'आपटा' या औषधी वनस्पतीची माहिती व वाचवा आपले आरोग्य.

## आपटा

दसऱ्या दिवशी आपटा वनस्पतीच्या फांद्या तोडल्या जातात. यामुळे आपट्यासारख्या बहुगुणी औषधी व धार्मिक वृक्ष ही आज दुर्मिळ बनत आहे. यासाठी आपट्याचीही लागवडकरणे आवश्यक आहे. बियांपासून रोपे तयार करुन आपट्याची सहज लागवड करता येते. आपटा या वृक्षास संस्कृतमध्ये अश्मंतक म्हणतात. याचे शास्त्रीय नाव 'बाहुनिया रेसिमोसा' असे आहे. आपटा हा औषधी वृक्ष असून त्याची साल, पाने, फुले व मूळ औषधात वापरतात. तुरट, शीतल व ग्राहक हे आपट्याचे गुणधर्म आहेत. आपट्याच्या सालीत टॅनिन व बियात फॅटी ऑईल व चेरियमसारखा डिंक असतो.

**आपट्याचे औषधी गुणधर्म पुढीलप्रमाणे : -**

१) पानांचा रस किंवा कोवळी फुले मिरी किंवा कांद्याबरोबर अतिसार व आवेत देतात.

२) तापातील डोके दुखीवर कोवळी पाने वाटून त्याचा लेप डोक्यावर लावतात.

३) लघवीतून खर पडत असल्यास कोवळ्या पानांचा रस दुधातून द्यावा.

४) आपट्याचा पाला, कारल्याच्या वेलीचा पाला व माका यांच्या समभाग रसात कुड्याचे पाल उगाळून नाळगुदात देतात.

५) वायुगोळा झाला असता आपट्याच्या पानांच्या रसात मिरपूड मिसळून दिल्यास त्वरित आराम मिळतो.

६) आपट्याच्या मुळाच्या सालीचा काढा दिल्यास पोटातील जंत देखील पडतात.

७) आपट्याची साल ठेचून सूज व जखमेवर बांधल्यास सूज कमी होते. जखम लवकर भरुन येते.

८) आपट्याची साल उकडून त्याची कात करतात. त्याचा उपयोग अतिसारात होतो.

९) आपट्यांच्या शेंगाचा काढा घेतल्यास लघवी वाढते.


छोट्या मित्रांनो चला, आपण आता संकल्प करु या की यावर्षी आपटा वनस्पतीचे किमान एकतरी रोप प्रत्येक विद्यार्थ्याच्या शेतात लावूया. म्हणजे एका वर्षात कितीतरी झाडे लावली जातील पण ही फक्त लावून उपयोग नाही तर याचे संगोपनही व्यवस्थितरित्या करावे लागेल. कराल ना या वनस्पतीचे संगोपन ?

**छोट्या दोस्तानो ! तुम्हाला 'एड्स' हा महाभयंकर रोग माहित आहेच, नाही का ? हा रोग कसा होतो ? त्याची लक्षणे काय ? त्यावर इलाज काय याची माहिती आहे का तुम्हाला ?**

एड्स (AIDS) म्हणजे ॲक्वायर्ड इम्युनों डिफिसियन्सी सिंड्रोम होय. हा रोग विषाणूमुळे होतो. (HIV) या रोगाची लक्षणे म्हणजे किरकोळ आजार सुध्दा लवकर बरा होत नाही. उदा. ताप येणे, संडासला लागणे, त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती कमी होते व वजन कमी होते. हा रोग असुरक्षित लैंगिक संबंधामुळे होतो. HIV बाधीत रक्तामुळे होतो, एड्स रोग्याची वापरलेली सुई इतरांना इंजेक्शनसाठी वापरली तरीही यातून एड्सचा प्रसार होतो. अशा या भयानक रोगावर उपाय शोधण्यात संशोधकांना मात्र अजून ही यश मिळत नाही. यामुळे या रोगाला मृत्यु शिवाय पर्याय नाही. पण आपल्या स्थानिक परिसरात औषधी वनस्पतीवर एड्सवरील इलाजावर संशोधन सुरु आहे. ते म्हणजे सूर्यफूल. विद्यार्थी मित्रहो, सुर्यफूल तुम्ही ओळखता. आपल्याकडे शेतात सूर्यफुलाचे पीक घेतात पण खाद्यतेला व्यतिरिक्त याचा खूप मोठा उपयोग आहे तो म्हणजे एड्स वरील उपायासाठी त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

## सुर्यफूल

सुर्यफूल आज एड्सविरोधी औषध शोधण्यात उपयुक्त ठरली आहेत सुर्यफुलांवर 'स्क्लेरोटिनिया स्क्लेरोटिओरम' नावाची बुरशी हल्ला करते. आणि सगळ पीक नष्ट करुन टाकते. परंतु काही झाड या बुरशीच्या हल्ल्याला परतवून लावतात ते त्यांच्यामधील एका वैशिष्ट्यामुळे. या फुलांमध्ये बुरशीविरोधी एक विशिष्ट ॲन्टी बॉडी तयार होते, ॲन्टी टॉक्सीन तयार होतं, त्याचं नाव डायकॅफेयॉल क्विनिक ॲसिड DCQA हेच DCQA एड्स विरोधी औषधात वापरले जाते. DCQA एड्सच्या विषाणूची माणसाच्या


कफनाशक
बेहडा

शरीरातील वाढ, प्रजनन होवू देत नाही. यापूर्वी देखील DCQA वापरले जात होते पण त्याची किंमत अतिशय असल्यानं एड्स विरोधी औषधे महाग असतात. आता सूर्यफुलापासून DCQA मिळत असल्याने ते अल्प किंमतीत तयार होईल. असा शास्त्रज्ञांना विश्वास आहे. बॉन विद्यापीठातील कृषी अभियंता क्लॉडीस सेरबॉनसीनी सूर्यफुलावर संशोधन करुन काही विशिष्ट सुर्यफुलेच DCQA का तयार करु शकतात हे ते शोधत आहेत. क्लिनिकल टेस्टिंगमध्ये अँटिटॉक्सिन निर्माण करणारी गुणसूत्रं मिळाली आहेत. त्याचबरोबर या प्रक्रियेत काम करणाऱ्या एन्झाइमचा शोध लागला आहे. त्यामुळेच DCQA च अधिक आणि स्वस्त उत्पादन करणे सोपं बनलं आहे. एड्सविरोधी औषध सहज आणि परवडेल अशा किंमतीत तयार करणे शक्य होईल असे वाटते. मग काय ठरवलंत ? जास्तीत जास्त सूर्यफुल पीक घेवून एड्स विरोधी औषध निर्मितीला सहाय्य करायच ना ? पण यासाठी तुम्ही तुमच्या पालकांना सुर्यफुलाचे पीक शेतात घेण्यासाठी सांगायच आहे.

## बेहडा

'बेहडा'हा वृक्ष मोठा असतो व मोठ्या पानाचा असतो व त्याचे बी काढून टाकलेले फळ औषधात वापरतात. बीच्या आतील बीजमज्जाही कधी कधी वापरली जाते. तुरट रसाचा, उष्ण वीर्याचा आणि रुक्ष व लघुगुणाचा बेहडा कफशामक आहे.

मुलांनो, स्थानिक परिसरामध्ये बेहड्याचे वृक्ष आढळतात तुम्ही ते पाहिलेत का ? याची फुले फिकट हिरव्या रंगाची असतात. त्यांना दुर्गंधी येते. झाडामध्ये भरपूर प्रमाणात टॅनिन असते. अशा या 'बेहडा' वनस्पतीचे औषधी गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत.

बेहड्याचे झाड मोठे असते. फुले फिकट हिरव्यारंगाची असतात. त्यांना दुर्गंधी येतो. झाडामध्ये भरपूर प्रमाणात टॅनिन असते. 'बेहडा' वनस्पतीमध्ये औषधी गुणधर्म पुढीलप्रमाणे.

१) बेहड्याच्या फळाचा गर, मीठ, मिरी आणि मध यांचे मिश्रण घेतल्यास खोकला बरा होतो. वाळलेल्या फळाला कणिक लावून ते भाजावे आणि नंतर खावे. कफ मोकळा होवून पडतो.

२) अपचन आणि जुलाब यासाठी बेहडा अत्यंत उपयुक्त आहे. फळाचा १ ते ३ ग्रॅम गर घेवून त्याचा काढा करुन प्यावा.

३) घसा बसला असेल तर वरील खोकल्यासाठीचे मिश्रण दिल्यास आवाज मोकळा होतो. भाजलेले फळ सुध्दा असेच गुणकारी आहे.

काळी कुसळी



मारवेल



४) अर्धेकच्चे फळ सारक असते. त्यामुळे बध्दकोष्ठ दूर होतो. याउलट पिकलेले आणि वाळलेले फळ खाल्ले तर जुलाब थांबतात.

५) बेहडा आणि पळस यांचे बी एकत्र करुन दिले तर पोटातले जंत पडतात. हे एकेक चमचा दिवसातून ३ वेळा घ्यावे सर्व प्रकारचे जंत पडतात.

६) डोळ्यातून सतत पाणी गळत असेल तर बेहड्याचे लोशन डोळ्यात टाकावे.

७) बेहडा बुध्दिवर्धक आहे. कुष्ठरोग, मुळव्याध, अंगावर सूज असणे, ज्वर इत्यादी रोगांवर बेहडा गुणकारी आहे.

८) बेहड्याच्या बीजमज्जेत पांढरे केस काळे करण्याचा गुण असल्याने आयुर्वेदिक केश्य तेलात बीजमज्जा टाकली जाते.

अशा या उपयुक्त वनस्पतीचे वृक्षारोपण तुम्ही स्थानिक परिसरात रस्त्याच्या कडेला किंवा शेतात करु शकता. कराल ना वृक्षारोपण ?

## गवत प्रकार

स्थानिक परिसरामध्ये विविध प्रकारच्या गवत प्रकारांची उपलब्धता आहे. या गवतामध्ये प्रथिनांचा समावेश असतो. त्याची पचनीयता उत्तम असते. त्यापासून आर्थिक सहाय्यही शेतकऱ्याला मिळते व जनावरांना उपयुक्त खाद्य उपलब्ध होते. खताचा वापर करुन याचे उत्पादन वाढविले जाते. हे गवत धूपनियंत्रक म्हणूनही कार्य करते.

मुलांनो, तुमच्यापैकी बहुतांशी विद्यार्थी शेतकऱ्यांची मुले आहात. तेंव्हा गवत कापण्यासाठी जाता. या गवताची माहिती सविस्तरपणे तुम्हाला असणे गरजेचे आहे. स्थानिक परिसरात मारवेल, मुशी, दिनानाथ, अंजनगवत, काळी कुसळी, करड इ. गवतप्रकार उपलब्ध आहेत. त्यापैकी काही गवत प्रकारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## मारवेल

या प्रकारचे गवत महाराष्ट्राच्या सर्व भागात आढळून येते. रासायनिक पृथ:करण व पचनीयता - १० आठवडे वाढीच्या गवतातील कच्च्या प्रथिनाचे प्रमाण ६.१७ असते. पचनीयता उत्तम.

**स्वादिष्ठता :** जनावरे मारवेल गवत अधिक आवडीने खातात.

**धूप नियंत्रण क्षमता :**

विस्तृत पसरणारीमुळे व उत्तम भूछाया यामुळे बांधाची व घळीची माती घट्ट धरुन ठेवण्याच्या दृष्टिने हे गवत अतिशय उपयुक्त आहे. २०° पेक्षा जास्त उतारावरील मातीची  धूप नियंत्रित करण्यासाठी देखील या गवताची लागवड उपयोगी आहे.

**गुणविशेष :**

विस्तृत भूभागावर रुजणे व वाढण्याची क्षमता आहे. क्षारयुक्त जमिनीवर देखील वाढण्याची क्षमता आहे.जमिनीची धूप रोखण्याची क्षमता चांगली आहे.

## काळीकुसळी

स्थानिक परिसरात याला 'पाणकणीस गवत' म्हणतात. हे गवत उघड्या तसेच गवताळ प्रदेशात उष्ण कटीबंधीय प्रदेशात सर्वत्र येते. नैसर्गिकपणे याचा प्रसार होतो.

**रासायनिक पृथ्थ:करण :**

ओल्या गवताची चाऱ्यासाठी कापणी केली असता त्यात ५.९%  कच्ची प्रथिने असतात.

**स्वादिष्ठता :**

कोवळे असताना रुचकर पण जसेजसे पक्व होईल तसे रुचकरता कमी होते.

**धूपनियंत्रण क्षमता :**

२०% पर्यंत उतार असणाऱ्या क्षेत्रात धूप नियंत्रक म्हणून अतिशय उपयुक्त आहे.

**उपयोग :**

शुष्क चारा म्हणून याचे महत्व आहे.

**गुणविशेष :**

कठीण परिस्थितीवर मात करुन वाढण्याची क्षमता बहुवार्षिकपणा, आगीला समर्थपणे तोंड देते. कोवळे असताना रुचकर तसेच हालक्या जमिनीत येते.

मुलांनो, अशा या उपयुक्त गवत प्रकारांचा पडिक जागेत खताचा वापर करुन जास्तीत जास्त उत्पन्न घेण्यास पालकांना सांगा त्यामुळे आर्थिक उत्पन्न मिळेल. जनावरांना पौष्टीक चारा मिळेल व जमिनीची धूपही थांबेल.

## फळझाडे

स्थानिक परिसरामध्ये आंबा, फणस, जांभूळ, चिंच, केळी, लिंबू, रामफळ, सिताफळ, चिक्कू, काजू, पपई इ. फळे देणाऱ्या वनस्पती आहेत. यापैकी काजू या वनस्पतीचे काजू बी मध्ये औषधी गुणधर्म आहेत. तसेच व्यावसायिक दृष्ट्याही प्रामुख्याने आंबा, फणस, काजू केळी ही फळझाडे अतिशय उपयुक्त आहेत.

मुलांनो, या फळझाडांपासून आपण जे उत्पन्न घेतो त्याची माहिती पुढीलप्रमाणे.


| वनस्पती | सरासरी हंगामी उत्पन्न |
|---|---|
| चिंच | २००० रु. |
| जांभूळ | ५०० रु. |
| काजू फळ | १००० रु. |
| काजू बी | ५००० रु. |
| फणस | १००० रु. |
| आंबा | ५००० रु. |

हेच आर्थिक उत्पन्न जास्त प्रमाणात मिळविण्यासाठी विविध फळ लागवड जास्त प्रमाणात करणे गरजेचे आहे.

विद्यार्थी मित्रहो या फळझाडांपासून आपण याहीपेक्षा जास्त उत्पन्न घेवू शकतो. पण यासाठी अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. अधुनिक संकरित बी-बियाणे, खते, किटकनाशके, आधुनिक पध्दती, साधने यांच्या वापरामुळे हे उत्पादन वाढवून तुम्ही तुमच्या घरचे आर्थिक उत्पन्न वाढवू शकता. यासाठी शासनामार्फत सामाजिक वनीकरण खात्यामार्फत, पंचायत समिती कृषी विभागामार्फत, तालुका कृषी विभागामार्फत विविध योजनांची माहिती, अनुदान दिले जाते याची माहिती आपल्याला असणे गरजेचे आहे.

सामाजिक वनीकरण विभागामार्फत रोपवाटिका, वनसंरक्षण, वनसंवर्धन, नर्सरी व्यवसाय मार्गदर्शन सहकार्य इ. अनेक महत्वाची कामे या वनीकरण विभागामार्फत केली जातात.

मुलांनो, शाळेला जेंव्हा सुट्टी असते तेंव्हा तुम्ही या स्थानिक परिसरातील जंगलात फिरता ना ? जंगलातील करवंदे, जांभळे खाता, ससा, कोल्हा, मोर इ. प्राणी बघता अशा या जंगलाची देखभाल कोण



करते माहित आहे का? नाही ना ? आपण प्रत्येकाने स्थानिक परिसरातील वनस्पती, प्राणी यांचे संरक्षण, संवर्ध केले पाहिजे. आपल्याप्रमाणेच सामाजिक वनीकरण विभाग या सर्वांची देखभाल करते. तुम्हाला या सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्याची पूर्ण माहिती होण्यासाठी या खात्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**ई) सामाजिक वनीकरण खाते : -**

पर्यावरण संरक्षण, संवर्धन करण्यासाठी शासनामार्फत सामाजिक वनीकरण विभाग कार्यरत आहे. राज्यपातळीवर १९८१-८२ पासून सामाजिक वनीकरण यंत्रणा कार्यरत आहे. या विभागाला केंद्रशासन, राज्यशासन व जागतिक बँकांचे सहाय्य मिळते.

**१) सामाजिक वनीकरण यंत्रणेच्या निर्मितीची उद्दिष्टे -**

१. ग्रामीण भागात इंधन, चारा, लहान इमारती लाकूड, फळे इ. दैनंदिन गरजांचा पुरवठा करणे.

२. ग्रामस्थांच्या खाजगी व सामुदायिक जमिनीवर निरंतर पुरवठा करता येईल असे वनोपत्र निर्माण करण्यासाठी ग्रामीण सहकार्य करणे.

३. निर्वनीकरणाचा वेग कमी करणे.

४. ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती करणे.

**महाराष्ट्र राज्यात सामाजिक वनीकरण यंत्रणेची प्रशासकीय संरचना -**

सामाजिक वनीकरण यंत्रणेचे राज्यस्तरीय म्हणजेच संचालकांचे कार्यालय शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे येथे आहे. मुख्य वनसंरक्षक दर्जाचे वन अधिकारी असणारे संचालक हे खाते प्रमुख म्हणून काम पहातात. सहा क्षेत्रीय कार्यालये आहेत, ठाणे (कोकण), नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर येथे ही कार्यालये आहेत. शिवाय जिल्हास्तरीय उपसंचालकांची स्वतंत्र कार्यालये आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये एक रोपवन अधिकारी, दोन सहाय्यक लागवड अधिकारी व एक लागवड कोतवाल असा कर्मचारी वृंद कार्यरत आहे.

सामाजिक वनीकरण यंत्रणेमार्फत अंमलबजावणी होत असलेले कार्यक्रम व योजना -

**२) जिल्हास्तरीय योजना-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत सामूहिक क्षेत्रावर वृक्षलागवड व मृद व जल संधारण कामे करणे.

**३) राज्यस्तरीय योजना -**

१. निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील सामूहिक जमिनीवर वृक्षलागवड करणे.

२. किसान रोपवाटिका योजना -

(१) रोपनिर्मितीचे तंत्रज्ञान जनतेपर्यंत पोहोचवितात. (२) अनुभवी लाभार्थींना खाजगी रोपवाटिकेचा पूरक व्यवसाय उपलब्ध करून देतात. (३) शासकीय निमशासकीय विभागासाठी रोपे उपलब्ध करून देतात. (४) स्थानिक पातळीवर वृक्षलागवडीसाठी रोपे उपलब्ध करून देतात.

रोपनिर्मितीसाठी विभागाकडून पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.

**अ) साहित्य रूपाने** - (अग्रीम)

| | |
|---|---|
| १) १० सेमी X २० सेमी आकाराच्या पॉलिथिन पिशवीच्या किंमतीपोटी | १२ पैसे / प्रतिरोप |
| २) बी-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके यावरील खर्चापोटी | ०३ पैसे / प्रतिरोप |
| ब) रोख रकमेच्या स्वरूपात मजूरीसाठी अग्रीम | १० पैसे / प्रतिरोप |
| | एकूण २५ पैसे / प्रतिरोप |

यासाठी लाभार्थ्याकडे स्वतःची किमान २ गुंठे जमिन हवी, जमीन निवासस्थानापासून जवळ असावी. बारमाही वाहतूक व्यवस्था उपलब्ध असावी, पाणी पुरवठ्याची पुरेशी सोय असावी. लाभार्थीने तयार केलेल्या रोपापैकी ५०% रोपे १ रु. प्रतिरोप या दराने सामाजिक वनीकरण विभागाकडून फेरविकत घेतली जातात. उर्वरित ५०% रोपांची विक्रि लाभार्थी त्याचे मर्जीनुसार हव्या त्या दराने करू शकतो.

**प्रशिक्षण कार्यक्रम -**

सामाजिक वनीकरण विभागाचे कर्मचारी व नागरिकांना प्रशिक्षण देवून त्याद्वारे जनजागृती घडविण्याच्या दृष्टीकोनातून सन १९९२-९३ या वर्षापासून सामाजिक वनीकरण विभागामार्फत अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था व जनतेला प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामागे लोकसहभागातून सामाजिक वनीकरणाचे कार्यक्रम राबविण्याकरिता जनतेला उद्युक्त करणे हा मुख्य हेतू आहे. सामाजिक वनीकरणाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचाव्यात, या योजना राबविण्यासाठी समाजात प्रभावीपणे कार्य करू शकणाऱ्या घटकांना याबाबत माहिती व्हावी व लाभार्थींना योजना राबविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे या हेतूने प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी केली गेली आहे.

**प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम -**

सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्षलागवड, मृद व जलसंवर्धनाच्या जनहिताच्या अनेक योजना राबविल्या जातात. या योजना लोकांचे सहकार्य घेवून, त्यांना योजना राबविणेसाठी प्रवृत्त करून, लोकसहभागाने राबविल्या जातात. सामाजिक वनीकरणाच्या या विविध योजनांची माहिती जनतेस होवून लोकांना या योजनेमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करण्याचे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन याबाबत विविध माध्यमाद्वारे जनजागृती करून लोकांचे त्यासाठी पूर्ण सहकार्य मिळविण्याचे उद्देशाने विविध माध्यमांद्वारे प्रचार व प्रसिद्धीचे काम केले जाते.

सामाजिक वनीकरण संचालनालयामार्फत प्रचार व प्रसिद्धीचे कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा तपशील पुढीलप्रमाणे-

**(अ) विद्यालयीन माध्यमाद्वारे प्रसिद्धी -**

जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय निबंध, चित्रकला व वक्तृत्त्व स्पर्धांच्या आयोजनातून प्रसिद्धी करतात. यासाठी प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन गटात विद्यार्थ्यांची विभागणी करतात. वृक्षसंवर्धन, वनीकरण, पडीक जमीन विकास, पर्यावरण संतुलन, मृद व जलसंधारण या विषयाबाबत जागृती केली जाते.

**(ब) बहिःशाल प्रसिद्धी -**

ग्रामसभा, राज्यस्तरीय खुली छायाचित्र स्पर्धा, कृषिप्रदर्शनात सहभाग, इत्यादीद्वारे प्रसिद्धी करतात.

**(क) मुद्रण माध्यमाद्वारे प्रसिद्धी -**

स्टीकर्स, घडिपत्रिका, भित्तीपत्रिका छपाई व वितरण, दिनदर्शिका छपाई व वितरण, यशोगाथा, स्मरणिका, योजनांची पुस्तिका, राज्यस्तरीय विजेत्या निबंधांचा समावेश असणारी निबंध पुस्तिका व वनश्री पुरस्काराबाबत घडिपत्रिकांची छपाई व वितरण.

**(ड) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसिद्धी -**

ध्वनिचित्रफितींची निर्मिती व प्रसारण, आकाशवाणी, दूरदर्शन इ. वरून जाहिरातींचे प्रसारण, आकाशवाणी व दूरदर्शनवरून वेळोवेळी तज्ञांच्या भाषणांचे/मुलाखतींचे प्रसारण.

याशिवाय सामाजिक वनीकरणाचे क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी 'महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार' व केंद्र शासनातर्फे 'इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र

पुरस्कार' दिला जातो. या पुरस्काराविषयीची कार्यवाही सामाजिक वनीकरण संचालनालयाचे प्रसिद्धी कक्षामार्फत करण्यात येते.

**४) केंद्रसहाय्यित योजना -**

१. पश्चिम घाट विकास कार्यक्रम.

२. एकात्मिक पडिक जमिन विकास कार्यक्रम.

३. केंद्र पुरस्कृत अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम.

४. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक सहाय्यित पाणलोट विकास कार्यक्रम.

**५) महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ अनुदानित कामे -**

१. चेतना केंद्र (निळोणा, केळापूर, चिखली, (जि. यवतमाळ), अंबड, जि. जालना) या केंद्रांना अनुक्रमे २३.७१ लाख, १०.४३ लाख, १४.०० लाख, ५.०० लाख, ५३.१४ लाख दिले जाते.

२. ग्रामपरिसर विकास कार्यक्रम.

**६) केंद्रशासनाच्या तंत्रज्ञान विकस, विस्तार व प्रशिक्षण योजनेअंतर्गत पथदर्शक प्रकल्प.**

१. तलावांचे क्षेत्रात मृदसंधारण व जलसंधारणाची कामे.

२. कृषीवानिकी प्रकल्प.

३. क्षारपड जमिन विकास कार्यक्रम.

४. बायोफर्टिलायझर प्रकल्प.

५. घळींचे क्षेत्राचा विकास करणे - जमिनीची धूप होवून निर्माण झालेल्या ओघळीची समस्या सोडविणे. यासाठी वनीकरण, नालाबांध बंदिस्ती इ. कामे करतात.

६. वनेतर पडिक जमिन क्षेत्राचा वानिकी कुरण विकासाद्वारे विकास - केंद्राच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून यासाठी अनुदान ४५.३६ लाख आहे.

७. औषधी वनस्पती बोर्ड सहाय्यित प्रकल्प - कोल्हापूर जिल्ह्यातील कागल रोपवाटिकेला ९ लाख रुपयांचे अर्थसहाय्य दिले गेले. सदर रोपनिर्मिती पूर्ण केली गेली.

८. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्राप्त निधीतील कामे - रस्त्याचे दुतर्फा वृक्षलागवड करणे.

९. पुरस्कार योजना - केंद्रशासनातर्फे राष्ट्रीय पुरस्कार - 'इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र' पुरस्कार देतात. महाराष्ट्र राज्याकडून 'वनश्री पुरस्कार' देतात. वनश्री पुरस्कारासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २५,०००, १५,०००, १०,००० रु.ची रक्कम राष्ट्रीय बचतपत्राच्या स्वरूपात दिली जाते. तसेच मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक प्रत्येक विजेत्याला देतात व पुरस्कार स्विकारण्यास येण्याजाण्याच्या खर्चासाठी ५०० रु. दिले जातात.

इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्काराची रक्कम १,००,००० रु. शिवाय पदक व प्रशस्तिपत्रक दिले जाते.

अशा प्रकारे सामाजिक वनीकरणाच्या विविध योजनेतून वृक्षसंरक्षण, संवर्धन करून पर्यावरणाच्या रक्षणाचे कार्य प्रभावीपणे केले जाते. म्हणून या वनीकरण विभागाला स्थानिक परिसरातील प्रत्येक व्यक्तीने सहकार्य करणे गरजेचे आहे.

मित्रहो, सामाजिक वनीकरण खात्याचे काम तुम्हाला माहित झाले तसेच प्रत्येक नागरिकाची सुध्दा पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी आहे. तेंव्हा स्थानिक परिसरातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पालकांना, मित्रांना याबाबत माहिती दिलीत तर पर्यावरण संरक्षण, संवर्धनाचे काम करण्यास अनेक हात एकत्र येतील यासाठी तुम्ही स्वत: काम करा व इतरांना सांगा. सांगाल ना ?

*********